**MHSI030001082025**

नियमीत फौजदारी खटला क्र.१२/२०११

**नि.क्र.२४३**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०६ याची साक्ष</u> –**

**मी याद्वारे असे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :**

माझे नांव : अरुण गोपाळ नाईक

वय सुमारे : ६५ वर्षे, धंदा –शेती

राहणार : होडावडे, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा.सरकारी वकील श्री.जी.आर.माजगावकर यांचे मार्फत</u>**

**०१.** मी २००६–२००७ या कालावधीत दिड वर्षाकरीता होडावडे गावचा उपसरपंच म्हणून कार्यरत होतो. त्यावेळी भोज दळवीवाडी मराठी शाळा क्र.३ च्या दुरुस्तीसाठी ठेकेदार शंकर दळवीला रुपये १७,०००/– चा बँक ऑफ इंडीया शाखा वेंगुर्ला चा चेक दिला होता. सदरचा चेक तत्कालीन सरपंच लक्ष्मी पार्सेकर व ग्रामसेवक बाबली बागायतकर यांचे सहीने दिला होता. सदर ठेकेदाराने चेक वटण्याकरीता बँकेत भरला असता ग्रामपंचायत होडावडे च्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने तो चेक न वटता परत आला. सदरची बाब ठेकेदार शंकर दळवी यांनी सरपंचाना येवून सांगितली. त्यानंतर सरपंच व ग्रामसेवक यांनी ग्रामपंचायतीच्या बँक ऑफ इंडिया शाखा वेंगुर्ला येथे जाऊन चौकशी केली असता त्यांना समजले की, शेखर नाईक याने बनावट चेक भरुन ग्रामपंचायतीच्या खात्यावरील रक्कम काढून घेतली आहे. ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, उपसरपंच यांच्या बैठकीत शेखर नाईक यांने सरपंच व ग्रामसेवक यांच्या बनावट सहया करुन चेक व्दारे ग्रामपंचायतीच्या वरील खात्यातून रक्कम काढल्याचे मान्य केले व चुक झाल्याचे कबुल केले. शेखर नाईक यांनी रुपये २,८४,०००/– इतक्या रक्कमेचा अपहार केला होता. त्यासंदर्भात सरपंच व ग्रामसेवक यांनी पोलीसात जाऊन तक्रार केली. सदर घटनेबाबत माझेकडे पोलीसांनी चौकशी केली होती.शेखर नाईक ग्रामपंचायतीचा शिपाई म्हणून काम करीत होत. मी त्याला पाहिल्यास ओळखू शकतो.

**सरतपास पूर्ण.**

**<u>आरोपी तर्फे वकीलांच्या विनंती वरुन प्रकरण उलटतपासाकरीता तहकुब.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by AVADHUT GAJANAN DESHINGKAR Date: 2026.03.24 18:46:59 +0530

ठिकाण :– ओरोस

दिनांक :– २४/०३/२०२६.

**( ए.जी.देशिंगकर )**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग–ओरोस.